ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ११ ऑगस्ट, १९५३ | अंक ११

## विविध माहिती

**डांसांना मारक मलम**—जम्मू येथील औषधी संशोधन-कार्यालयांत एका प्रकारच्या फुलापासून डांसांना मारक ठरणारें मलम तयार करण्यांत येत आहे. हें मलम ज्या फुलांपासून तयार होतें तीं फुलें केनिआ, जपान अगर इतर देशांपेक्षा काश्मीरमध्येंच अधिक चांगलीं होतात असें आढळून आलें आहे.

**करवसुली स्थगित**—गुजराथमधील धंदुका तालुक्यांतील १७ खेड्यांत दुष्काळी परिस्थिति असल्यानें अहमदाबाद जिल्हा-बोर्डानें सदर गांवापासून वसूल करावयाचा १०,००० रुपये स्थानिक कर न घेण्याचें ठरविलें आहे. गेलीं तीन वर्षें सतत दुष्काळ पडल्यामुळें कलेक्टरनें अशी शिफारस केली होती.

**ऑस्ट्रेलिआंत मुबलक जागा**—ऑस्ट्रेलिआचे एक मंत्री मि. होल्ट ह्यांनीं असें बोलून दाखविलें कीं दरवर्षीं १,००,००० नव्या वसाहतवाल्यांची सोय ऑस्ट्रेलिआंत होऊं शकेल आणि तसें केल्यानें ऑस्ट्रेलिअन लोकांच्या सध्यांच्या रहाणींत कांहीं फरक पडणार नाहीं. ऑस्ट्रेलिआंत नवीन वसाहतवाले आले तर रहाणीचा दर्जा खालावेल, अशी भीति व्यक्त करण्यांत येत असते.

**रशिआ-आइसलंड व्यापारी करार**—रशिआ व आइसलंड ह्यांनीं परस्परांत व्यापारी करार केला आहे. रशिआ आइसलंडला तेल, पीठ, सिमेंट, इत्यादि माल पुरविणार असून त्याच्या बदला गोठवलेले मासे व मीठ पुढील वर्षापासून घेणार आहे.

**भारतामधील अणुशक्तीचा विकास**—भारत सरकारनें अणुशक्तीचा विकास करण्याचें ठरविलें असून ती शक्ति निर्माण करण्यास उपयुक्त अशीं खनिजें शोधण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत आलें आहे. त्याशिवाय अणुशक्तीच्या वैद्यकीय उपयोगाकडेहि लक्ष पुरविण्यांत येणार आहे.

**पाकिस्ताननें मोटारींच्या किंमती निश्चित केल्या**—पाकिस्तान सरकारनें ऑस्टिन, हिलमन, फिॲट आणि मॉरिस मायनर ह्या मोटारींच्या किंमती निश्चित केल्या आहेत. पाकिस्तानी रुपयांत पुढीलप्रमाणें किंमती नियंत्रित करण्यांत आल्या आहेत:— मॉरिस मायनॉर ८,६०९ रु., ऑस्टिन (४०) १०,३८८रु., फिआट ८,२३० रु., आणि ऑस्टिन (३०) १०,७२२ रुपये.

**दामोदर धरण पूर्ण झाल्यावर**— दामोदर खोरें-धरण-योजना पूर्ण झाल्यावर अमेरिकेंतील टी. व्ही. ए. धरणापेक्षाहि अधिक फायदे होतील असा अंदाज करण्यांत आला आहे. १,५०० मैल लांबीच्या कालव्यांतून १० लाखापेक्षा अधिक एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊन भारताचें अन्न-धान्याचें उत्पादन ४,००,००० टनांनीं वाढेल. त्याशिवाय कालव्यांतून वहातूक होईल, जमिनींची धूप थांबेल, मलेरिआवर नियंत्रण बसेल आणि २,७५,००० किलोवॅट वीज उत्पन्न होईल.

**तांदुळाची किंमत कमी केली तर**—सध्या कलकत्ता शहरांतील शिधादुकानांतून जो मध्यम प्रतीचा तांदूळ देण्यांत येतो त्याची किंमत जर दोन आण्यांनीं उतरविण्यांत आली तर प. बंगाल सरकारला १,४४,००,००० रुपयांचें नुकसान सोसावें लागेल. हल्लीं ज्या दरानें तांदूळ विकण्यांत येत आहे त्या दरानें सरकारला १४ लाख रुपयांचा तोटा सोसावा लागत आहे.

**रशिआची औद्योगिक स्पर्धा**—ब्रिटिश पार्लमेंटचे एक पार्लमेंटरी सेक्रटरी मि. वॅटकिन्सन म्हणाले कीं जगाच्या बाजारपेठेंत सध्याच जपानच्या आणि जर्मनीच्या मालाची स्पर्धा होऊं लागली आहे. पण, रशिआचा पांचवा पंचवार्षिक पुरा झाल्यावर रशिआची ही स्पर्धा आणखी जाणवूं लागेल. आणखी दहा वर्षांनीं रशिआचें उत्पादन प. युरोप व ब्रिटन ह्यांच्यापेक्षाहि अधिक होईल.

**युद्ध संपलें, आतां पुनर्घटना**—कोरिआंतील युद्ध संपण्याच्या सुमारास लँकेशायरमधील प्लॅट ब्रदर्स ह्या कारखान्यानें द. कोरिआला कापड विणण्याची यंत्रसामुग्री पुरविण्याची ऑर्डर मिळविली आहे. मागणी तीन गिरण्यांची असून तीसाठी कारखान्याला ८,५०,००० पौंड किंमत मिळणार आहे. हें गिऱ्हाईक मिळविण्याची बरीच स्पर्धा लागली होती.

**ब्रिटन-रशिआ व्यापार**—ब्रिटनला लाकडाच्या पेट्या पुरवून त्याच्या मोबदला ५,००,००० पौंड किंमतीचें लोकरीचें कापड घेण्याचा करार उभयता राष्ट्रांनीं केला आहे. जपानकडून होणाऱ्या तीव्र स्पर्धेमुळें ब्रिटिश कापड-कारखानदार नव्या गिऱ्हाइकांच्या शोधांत असून रशिआकडून आणखीहि मोठी मागणी येईल अशी आशा त्यांना वाटत आहे.

**मोटारीवर विक्रीकर**—आसाम राज्यांत ज्या मोटारी आणल्या असतील त्यांनीं जर कोणत्याहि राज्यांत विक्रीकर दिलेला नसेल तर त्यांच्या मालकाकडून विक्रीकर वसूल करण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें आहे. विक्रीकराची पावती हजर केल्या-खेरीज मोटारींना रजिस्ट्रेशनचा दाखला देण्यांत येऊं नये, असा हुकूम काढण्यांत आला आहे.

**बनारस विद्यापीठाला मदत**—अमेरिकन सरकारनें बनारस विद्यापीठाला ६५,००० डॉलर्सची खास देणगी दिली असल्याचें समजतें. पैकीं ४०,००० डॉलर्स प्रयोगशाळेसाठीं खर्च करण्यांत यावयाचे असून बाकीची रक्कम ग्रंथालयासाठीं पुस्तकें खरेदी करण्यासाठीं खर्च व्हावयाची आहे.

**कलकत्त्यामधील दंग्यांची किंमत**—कलकत्ता शहरांतील ट्रॅमचे दर वाढविल्यामुळें ज्या दंगली झाल्या, त्यामुळें शहरांतील पोलिसांच्या मोटारींना ३ जुलै ते २१ जुलैपर्यंतच्या काळांत ५३,००० रुपयांचें पेट्रोल वापरावें लागलें, असें समजतें.

## भारत–बल्गेरिआ व्यापारी करार

भारताच्या आणि बल्गेरिआच्या सरकारांनीं परस्परांत एक व्यापारी करार केला आहे. कराराची मुद्दत १ जून, १९५३ तें ३१ डिसेंबर, १९५४ अशी आहे. युद्धोत्तर कालांत उभयता देशांत झालेला पहिलाच व्यापारी करार असून परस्परांनीं एक-मेकांत मधस्थाशिवाय सरळ व्यापार करण्यास उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. बल्गेरिआंतील आयात–निर्यात व्यापार सरकारच्या हातीं असल्यामुळें करारांत ठरलेला माल पुरविण्याची जबाबदारी अर्थात्च त्या देशाच्या सरकारनें घेतली आहे. भारत बल्गेरिआला पुढील प्रमाणें वस्तू पुरविणार आहे:—चहा, मसाल्याचे पदार्थ, उद्भिज तेलें, एरंडेल तेल, कच्ची लोकर, कापूस, काथ्याच्या दोऱ्या, औषधें, मेण, विजेच्या तारा, विजेचे दिवे, मच्छिमारींचीं साधनें, इत्यादि. बल्गेरिआ भारताला पुढीलप्रमाणें माल पुरविणार आहे:—फळें, कौलें, कारबाईड, इलेक्ट्रोमीटर्स, ५० अश्वशक्तीच्या पुढील इलेक्ट्रिक मोटर्स, यांत्रिक मोठे हातोडे आणि इतर कांहीं प्रकारची यंत्रसामुग्री. गेल्या महायुद्धाच्या अखेरीस बल्गेरिआ हा देश सोव्हिएट रशिआच्या कक्षेंत गेलेला आहे. पूर्वेकडील राष्ट्रांचा हा जो गट आहे त्या गटाशीं व्यापार केल्याशिवाय प. युरोपची अर्थव्यवस्था सुधारणार नाहीं अशा प्रकारचा मतप्रवाह ब्रिटनसारख्या देशांतूनहि आढळून येतो. पण कांहीं आगंतुक राजकीय कारणांमुळें असा व्यापार सध्या फारसा होऊं शकत नाहीं. राजकीय मतभेद व्यापार करण्याच्या आड येऊं न देण्याचें भारतीय धोरण मात्र प. युरोपांतील राष्ट्रांच्या धोरणापासून स्वतंत्र आहे. म्हणूनच, वरील व्यापारी करार होऊं शकला.


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल .... | रु. | ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड .... | रु. | ६,१६,००० |

बँकेच्या शाखा

मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण ), पुणें ( डेक्कन जिमखाना व खडकी ), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, दु. हैद्राबाद, सांगली, अमरावती, ठाणें व हरिहर ( म्हैसूर सं. )

बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्मधील एक कप्पा आपल्या मौल्यवान चीजवस्तूंसाठी आजच राखून ठेवा.

थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं वि. जोग,
मॅनेजर.


## आयात–विषयक परवान्यांचा अहवाल

भारताच्या आयात–नियंत्रण संघटनेतर्फे आयातीचे परवाने देण्यांत येत असतात. सरकारच्या व्यापार–खात्यानें ह्यासंबंधींचें एक पत्रक काढलें आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, चालू वर्षाच्या जानेवारी ते जून ह्या सहामाहींत एकूण ५९,२२२ आयातीचे परवाने देण्यांत आले. सर्व आयात–परवान्यांची मिळून किंमत २३१ कोटी रुपये झाली. ह्या कालअखेर फक्त ६५९ अर्जांचा विचार करण्याचें राहिलें होतें. जुलै ते डिसेंबर, १९५२ ह्या सहामाहींत आलेल्या अर्जांच्या दुप्पट अर्ज वरील कालांत करण्यांत आले आणि त्यांची विल्हेवाटहि झटपट लावण्यांत आली. ह्या कालांत मुख्य कचेरींत आलेल्या अगर बंदरांत करण्यांत आलेल्या आयातविषयक अर्जांच्या संख्येनेंहि उच्चांक गांठला असें दिसून येतें. दोन्ही ठिकाणीं मिळून ७६,५७८ नवीन अर्ज करण्यांत आले होते. सरकारच्या आयात–धोरणाविषयीं आणि नियमांच्या अर्थाविषयीं पृच्छा करणारीं पत्रें सुमारें १,६३,१६९ इतकीं आलीं. आयात करणाऱ्या कंपन्यांनीं गैरवाजवी प्रकार केल्याच्या १२८ तक्रारी खात्याकडे करण्यांत आल्या आणि त्या चौकशीसाठी पोलिसांकडे सोंपविण्यांत आल्या. २३ प्रकरणांत खटले भरण्यांत आले आणि २८ कंपन्यांचीं नांवें काळ्या यादींत दाखल करण्यांत आलीं. गैरवर्तणूक केल्याबद्दल एक गॅझेटेड ऑफिसर, एक सुपरिंटेंडेंट व १६ कारकून ह्यांच्यावर आरोप ठेवण्यांत आले. ३० नौकरांच्या वर्तनाबद्दल संशय उत्पन्न झाल्यामुळें त्यांना कामावरून कमी करण्यांत आलें.

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यासाठीं खास सहकारी सोसायट्यांचे नोकरांसाठी व उमेदवारांसाठी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, नाशिक येथें, ता. १५–८–५३ ते १५–१०–५३ अखेर मुदतीचा भरवावयाचा आहे. नोकरांनीं आपापल्या संस्थेमार्फत अर्ज करावेत. ज्या उमेदवारांना सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं को–आपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, २१७८, मधली होळी नाशिक, यांचेकडे ता. १५–८–५३ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. २ लगत पाठवावी. क्लास फीशिवाय अर्ज स्वीकारले जाणार नाहींत. उमेदवारांना व संस्थांचे नोकरांना सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याहि सबबीवर परत केली जाणार नाहीं. उमेदवारानें निदान व्ह० फा० पास अगर इंग्रजी पांचवी इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलेलें पाहिजे अगर सहकारी सोसायटींत काम करीत असला पाहिजे. अर्जांत नांव, शिक्षण, वय, पूर्ण पत्ता, आणि सहकारी संस्थेंत काम करीत असलेबद्दलचा दाखला जोडून नमूद केलेले असावे. क्लासचे मुदतींत परीक्षा फी रु. ३ भरावी लागेल. त्याशिवाय परीक्षेस बसविलें जाणार नाहीं. यशस्वी उमेदवारांना सहकारी संस्थेंत नेमतांना सदर शिक्षणास प्राधान्य यापुढें दिलें जाईल. तसेंच विद्यमान नोकरांनीं सदर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यांना यापुढें कामावर ठेवलें जाणार नाहीं, अशी खात्याची दृष्टि आहे. तरी सोसायट्यांच्या नोकरांनीं याकडे लक्ष देऊन शिक्षण घेणेची दक्षता घ्यावी. उमेदवारांनीं, नाशिक तालुका को. सुपरवायझिंग युनिअन C/o जिल्हा बटाटा कमिटी, मेनरोड, नाशिक, चे ऑफिसांत समक्ष जातीनें तारीख १५–८–१९५३ रोजीं, दुपारीं १२ वाजतां, बिनचूक हजर व्हावें.

एन्. वाय, कुलकर्णी.
को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग
इन्स्पेक्टर, नाशिक.

वामनराव गोविंदराव पाटील.
चेअरमन
नाशिक डिस्ट्रिक्ट को. बोर्ड लि.

# अर्थ

बुधवार, ता. १२ ऑगस्ट, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शहरी मध्यमवर्गीय सुशिक्षितांची वाढती बेकारी

शहरांतील वाढत्या बेकारीस आळा घालण्याच्या दृष्टीनें प्लॅनिंग कमिशननें राज्य-सरकारांकडे एक ११ कलमी योजना पाठविली आहे, तिची माहिती ह्याच पृष्ठावर दुसरीकडे देण्यांत आली आहे. बेकारीसंबंधीं पद्धतशीर आकडेवार माहिती पुरेशा प्रमाणांत आज उपलब्ध नसली तरी बेकारीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे, हें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं. भारतांत सध्या १३५ उद्योगविनिमय केंद्रें (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) आहेत आणि त्यांचेकडील आकडेवारी बेकारांची वाढ दाखविण्यास पुरेसी आहे. १९४९ मध्यें १०,६६,३५१ लोकांनीं ह्या केंद्रांत नोकरीसाठी अर्ज नोंदविले; १९५२ मध्यें ही संख्या १४,७६,६९९ एवढी झाली. १९५३ च्या पहिल्या चार महिन्यांतील आकडा ४,५०,९७० आहे. ज्या लोकांना केंद्रें काम मिळवून देऊं शकलीं, अशा लोकांची संख्या घटत चालली आहे. १९५१ मध्यें ४,१६,८५८ लोकांना काम मिळूं शकलें, तर १९५२ मध्यें ही संख्या फक्त ३,५७,८२८ भरली. १९५२ मधील ह्या संख्येची मासिक सरासरी ३०,००० होती; १९५३ च्या जानेवारींत तत्सम आकडा २०,३७८ तर एप्रिलचा आकडा फक्त १६,२३३ होता! काम शोधणारे वाढले; काम मिळणारे कमी कमी होत चालले. मालकवर्गाला नवे नोकर व कामगार आवश्यक नसल्यानें रिकाम्या होणाऱ्या जागांची संख्या घटत चालली आहे, त्यामुळें नांव नोंदून कामाची वाट पहात बसणारांची संख्या वाढत चालली आहे. एक वर्षापूर्वीच्या मानानें एप्रिल, १९५३ मध्यें असे लोक १,००,००० अधिक होते.

एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे नांवें नोंदविणारांत सुशिक्षितांचाच भरणा मोठा असतो; तेव्हां ह्या आकड्यांवरून मध्यमवर्गीयांच्या वाढत्या हलाखीची कल्पना येऊं शकेल. शाळा–कॉलेजांतून शिकून बाहेर पडणारांना उपजीविकेचें साधन मिळणें अधिकाधिक बिकट होत चाललें आहे. त्याला उपाय म्हणजे विद्यार्थ्यांना यांत्रिक व औद्योगिक शिक्षण देणें हा होय, असें सांगण्यांत येतें. परंतु, अशा शिक्षणाचाहि नोकरी मिळण्याच्या दृष्टीनें व्हावयाचा फायदा अत्यंत मर्यादितच आहे. ह्या क्षेत्रांतहि फारशा लोकांना जागा नाहीं. पंचवार्षिक योजनेचें उद्दिष्ट फार मोठें नसलें, तरीसुद्धां त्यांत अपेक्षित असलेल्या नोकऱ्यांची व कामाची वाढ अनुभवास येऊं लागलेली नाहीं. उत्पादक कार्यांत गुंतलेल्यांच्या मानानें बेकारांची संख्या अप्रमाण वाढली, तर फारच मोठी आपत्ति कोसळेल. कोणासहि काम दिलें, तर त्या कामाच्या उठावाची किंमत मोबदल्यापेक्षा जास्त भरली नाहीं, तर सर्व कारभार कालांतरानें आतबट्ट्याचाच ठरेल. म्हणून, हा प्रश्न काळजीपूर्वक हाताळला पाहिजे.

## शहरी विभागांतील बेकारी

### जनतेच्या भीतीस नियोजनमंडळाचें आश्वासन व उपाययोजना

शहरी विभागांतील बेकारीबाबत नियोजनमंडळानें राज्य-सरकारांना अलिकडेच एक परिपत्रक पाठविलें आहे. या बाबतींत असें निर्देशिण्यांत येत आहे कीं, नियोजनांत नोकरीच्या प्रश्नालाहि बरेंच प्रमुख स्थान दिलेलें आहे. नोकरीविषयक योग्य धोरणाचा पाया घालण्याच्या दृष्टीनें कांहीं उपायहि सुचविले होते. विकासयोजनांत बेकार मनुष्यबळाचा कमाल उपयोग, पैशाच्या रूपानें मिळणाऱ्या उत्पन्नाची किमान वाढ, भांडवल-उभारणीस चालना, तंत्रविद्यात्मक बदलांमुळें उद्भवणाऱ्या बेसुमार बेकारीविरुद्ध संरक्षण आणि नोकऱ्यांची संधि कमाल प्रमाणांत रहावी म्हणून नव्या धंद्यांतील भांडवलगुंतवणीचें योग्य वांटप, अशा कांहीं शिफारशीहि मंडळानें केल्या होत्या.

तरी देखील कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणींत, संकल्पित विकासांचा वेग आणि प्रत्यक्ष साध्य झालेल्या गोष्टी यांमध्यें तफावत पडली असल्याचें नियोजनमंडळाला वाटतें. योजनेंतील बऱ्याचशा विकासयोजना, नियोजन होण्यापूर्वींच सुरू झालेल्या होत्या आणि नोकरीविषयक परिस्थितीवर परिणाम करतील अशी योजनेंतील सामाजिक व आर्थिक धोरणें अद्यापि पुरेशा प्रमाणांत अमलांत आलेलीं नाहींत हें याचें प्रमुख कारण आहे. ही तफावत दूर करून, मध्य व राज्य–सरकारांनीं अवश्य ती जुळवाजुळव करावी असें नियोजनमंडळाचें मत आहे. मध्यवर्ती सरकारच्या योजनांबाबत सरकारच्या खात्यांच्या सल्ल्यानें नियोजनमंडळ या दृष्टीनें पाहणी करीत आहे.

नियोजनमंडळाच्या परिपत्रकांतील शिफारशी केवळ शहरी भागांतील बेकारीबाबत आहेत. ग्रामीण भागांत नियोजनांतील मोठमोठ्या योजनांनीं नोकऱ्यांच्या धंद्यांत वाढ झाली आहे. शिक्षितांची बेकारी पुढील कार्यक्रमानें कांहीं प्रमाणांत कमी होईल असें सांगण्यांत येत आहे. त्या सूचना अशा:—(१) स्टेट अेड टु इंडस्ट्रीज ॲक्ट किंवा इतर अशाच कायद्यान्वयें व्यक्तींना किंवा जनतेच्या छोट्या गटांना छोटेखानी धंदे व व्यवसाय उभारण्यास खास मदत; (२) मनुष्यबळाचा तुटवडा सध्या असणाऱ्या क्षेत्रांत, शिक्षण देऊन माणसें तयार करण्याच्या सवलतींत वाढ; (३) राज्यसरकारें व स्थानिक संस्थांना लागणारा माल ग्रामोद्योग व छोटेखानी धंद्यांत तयार झालेला घेऊन त्यांना सक्रिय उत्तेजन; (४) शहरी विभागांत प्रौढ साक्षरता वर्ग चालविण्यास नगरपालिका, शिक्षण–संस्था व स्वयंसेवक संघटनांना साह्य; ग्रामीण भागांत एकशिक्षकी शाळा उघडण्यास उत्तेजन द्यावें; (५) राष्ट्रीय शेती–विस्तार, संघटना अधिक धैर्यानें अमलांत आणणें, कारण त्यामुळें ग्रामीण अर्थ-व्यवस्थेंत वाढ होईल व शिक्षितांची बेकारी निवारण करण्याचे कामीं तातडतोब मदत होईल; (६) मोटारवाहतुकीचा विकास,

विशेषतः खासगी संस्थामार्फत, साधण्यासाठी परवाना धोरणांचा फेरविचार; (७) गलिच्छ वस्त्या काढून टाकण्याच्या व कमी उत्पन्नाच्या लोकांसाठी घरबांधणीच्या योजनांची अंमलबजावणी; (८) खासगी घरबांधणीस उत्तेजन; (९) निर्वासितांच्या नगरांना योजनापूर्वक साह्य; (१०) खासगी भांडवलवाल्यांनीं पुरस्कारिलेल्या विद्युत् विकासाच्या योजनांना उत्तेजन, राज्य-सरकार वीज-परिस्थितीची पाहणी करून नव्या योजना मांडतील; (११) जेथें कामाची संधि मिळण्यासारखी आहे अशा ठिकाणीं काम व शिक्षणकेंद्रांची स्थापना. उदाहरणार्थ, गलिच्छ वस्त्या दूर करण्याची योजना, कमी उत्पादनाच्या गटासाठी घरबांधणी, पाटबंधारे व विद्युत-केंद्रें, रस्ते, विकासयोजना, वगैरे.

निरोगी, ज्यांचें कांहीं शिक्षण झालें आहे व दिलेलें कोणतेंहि काम करण्यास उत्सुक आहेत अशा तरुणांसाठीं वरील कामें आहेत. अशा प्रकारच्या केंद्रांत आतांच्या काळांत तेथील प्रत्येक उमेदवाराला निर्वाह होण्यापुरेसें वेतन व शिक्षण मिळावें व शारीरिक श्रमाबद्दलच्या दृष्टिकोनांत बदल व्हावा. उद्योगविनिमय केंद्राचा पुरेपूर उपयोग करून घेण्यांत आला व राज्यसरकारें, तसेंच खासगी मालक यांनीं आपलेकडील सर्व रिकाम्या जागांची माहिती त्यांना दिली, तर अशा कामकेंद्रांतील माणसांना लवकरच सामावून घेणें सोपें जाईल.

याखेरीज, (१) लोकवस्तींत वाढ व त्याचे जोडीस खेड्यांतून शहरांकडे होणारी खेडुतांची वाढती आवक आणि (२) केवळ कारकुनी स्वरूपाच्या नोकऱ्या शोधणाऱ्या शिक्षितांच्या संख्येंत वाढ याही दोन बाबींमुळें बेकारींत वाढ होत असते. शक्य तितक्या शिक्षित व्यक्तींची राष्ट्रीय शेतीविस्तार संघटनेंत सोय करण्याबरोबरच विद्यापीठ शिक्षणापूर्वी इतर उपयुक्त मार्ग खुले करण्याचे उपाय दूरवरचें उद्दिष्ट म्हणून समजूं नये यावर मंडळानें परिपत्रकांत भर दिला आहे. इंटर वा पदवीधरांची संख्या अशीच वाढत राहील तर शिक्षित बेकारांचा प्रश्न कधींच सुटणार नाहीं. म्हणून मॅट्रिक झालेल्यांना शेती-शाळा, तांत्रिक संस्थांकडे वळविणें वगैरे उपाय तांतडीचे समजावेत.

### कल्याण पीपल्स को. बँकेची अंबरनाथ शाखा

वरील शाखेचा उद्घाटनसमारंभ ठाण्याचे कलेक्टर श्री. डी. जे. मदन, आय. सी एस., ह्यांच्या हस्तें शनिवार, ता. १५ ऑगस्ट रोजीं होणार आहे.

### बँकर्स वार्षिक पुस्तक : कांहीं लेखक व लेख

पूना बँकिंग असोसिएशनतर्फे प्रसिद्ध व्हावयाच्या "बँकर्स ॲन्युअल नंबर" ची तयारी पुरी होत आली आहे. आतांपर्यंत हातीं आलेल्या लेखांचा व लेखकांचा तपशील खालीं दिला आहे.

| लेखक | लेखाचा विषय |
|---|---|
| १ शेठ प्राणलाल देवकरण नानजी, मुंबई | बँकिंग व उद्योगधंदे |
| २ श्री. डी. एस. सावकार, मुंबई | राष्ट्रीय विकासांत बँकिंगचें स्थान |
| ३ श्री. डी. फ्रीमन, मुंबई, | शिपिंग व बँकिंग |
| ४ श्री. के. पी. मॅथ्यू, कोटयम | त्रावणकोर-कोचीनमधील बँकिंग |
| ५ सरदार मोहनसिंग | "फिरती" बँक-"चाकावरील" बँक |
| ६ डॉ. टी. एम्. पै | छोट्या ठेवी |
| ७ श्री. नारायण रेड्डी | म्हैसूर बँकेची हाऊसिंग योजना |
| ८ श्री. श्री. वा. काळे | क्रेडिट इन्शुअरन्सचें बँक कर्जास तारण |
| ९ प्रो. के. आर. कुलकर्णी | सहकारी बँकिंगमध्यें अर्बन बँकिंगचें स्थान |
| १० श्री. जी. व्ही. सराफ | न्यायकोर्ट व बँका |
| ११ श्री. डी. डी. देशपांडे | हिंदी बँकिंगच्या प्रगतीची दिशा |
| १२ श्री. के. एम्. नायक. | बँकेच्या जाहिरातीसंबंधीं कांहीं विचार |
| १३ श्री. सी. व्ही. जोग | बँकिंग कंपन्यांचा कायदा |
| १४ प्रो. डी. एस. मराठे | कायद्याचे कांहीं निवाडे |
| १५ श्री. डी. एन्. गांडेकर | बँकिंगचा पाया भक्कम केल्यानें त्याची उपयुक्तता वाढेल |
| १६ श्री. एन्. एन्. क्षीरसागर | बँकांच्या अध्यक्षांचीं भाषणें |
| १७ श्री. बी. बी. पुरोहित | बँकिंगविषयक कांहीं वचनें |
| १८ श्री. एम्. व्ही. मद्राने | बँकिंगनें महाराष्ट्रासाठी काय केलें आहे? |

### साबणाच्या किंमती उतरवितां येणार नाहींत

"साबणाच्या उत्पादन खर्चापैकी ६०% खर्च त्यांतील वनस्पति तेलाचा असतो. ह्या तेलांची किंमत फार चढीची आहे. भुइमुगाच्या तेलाच्या किंमती सध्या ज्या पातळीवर आहेत, तेवढी उच्च पातळी त्यांनीं ह्यापूर्वी कधींच गाठली नव्हती. कामगारांचें वेतन, हा उत्पादनखर्चांतील दुसरा महत्त्वाचा भागहि कारखानदारांच्या हातांत राहिलेला नाहीं. त्यामुळें, साबणाच्या किंमती उतरविण्यास फारसा वाव नाहीं."—टाटा ऑइल मिल्सच्या वार्षिक सभेंत अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांचें भाषण.

### हिंदी आणि प्रादेशिक भाषांतील चित्रपट निर्मिति

| | मुंबई (पुणें व कोल्हापूर धरून) | | | प. बंगाल (व कलकत्ता) | | | द. भारत, मद्रास, सालेम, कोइमतूर व अलेप्पी | | | एकूण | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदी | प्रादे. भाषा | एकूण | हिंदी | प्रादे. भाषा | एकूण | हिंदी | प्रादेशिक भाषा | एकूण | हिंदी | प्रादेशिक भाषा | एकूण | *लाहोर |
| १९४६ | १४३ | ७ | १५० | ८ | १५ | २३ | ... | २२ | २२ | १५१ +४* | ४४+१* | १९५ | ५ |
| १९४७ | १६९ | २६ | १९५ | १२ | ३४ | ४६ | ... | ३७ | ३७ | १८१ +५* | ९७ | २७८ | ५ |
| १९४८ | १३२ | ३९ | १७१ | १३ | ३९ | ५२ | २ | ३९ | ४१ | १४७ +१* | ११७ | २६४ | १ |
| १९४९ | १३८ | ३६ | १७४ | १८ | ६४ | ८२ | १ | ३२ | ३३ | १५७ | १३२ | २८९ | |
| १९५० | १०६ | ३८ | १४४ | ७ | ४४ | ५१ | २ | ४४ | ४६ | ११५ | १२६ | २४१ | |
| १९५१ | ९१ | २७ | ११८ | ५ | ४० | ४५ | ४ | ५४ | ५८ | १०० | १२१ | २२१ | |
| १९५२ | ९१ | २१ | ११२ | ६ | ४२ | ४८ | ५ | ६८ | ७३ | १०२ | १३१ | २३३ | |

# लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या औद्योगिक कामगिरीची थोरवी

## सर विश्वेश्वरअय्यांनीं केलेलें विवेचन

" किर्लोस्करांच्या सर्व कारखान्यांत मिळून आज ४,०००.कामगारांना काम मिळत आहे व त्यांत दरसाल सुमारें २ कोटि रुपये किंमतीच्या मालाचें उत्पादन होत आहे. किर्लोस्कर औद्योगिक घराण्याचे जनक लक्ष्मणराव ह्यांची अत्यंत उच्च दर्जाची उत्पादनक्षमता सिद्ध झाली आहे. त्यांनीं एकामागून एक स्थापन केलेल्या कारखान्यांची वाढ योग्य त्या अनुक्रमानें झालेली आहे व त्यावरून लक्ष्मणरावांची दूरदृष्टि व नेतृत्वाचें कौशल्य स्पष्ट झालें आहे. लायकी आणि धमेंक असणाऱ्या तरुणांना लक्ष्मणरावांच्या आयुष्यक्रमापासून पुष्कळच शिकतां येईल. नव्या नव्या परिस्थितीस तोंड देण्याची त्यांची तत्परता व कार्यक्षमता ही उद्योगपतींना मार्ग-दर्शक व उत्साहवर्धक वाटेल. आपला देश यंत्रसामुग्रीच्या उत्पादनाचे बाबतींत व यांत्रिक साधनांचा उपयोग करण्याच्या बाबतींत अद्याप अविकसित आहे; ह्या संबंधांतील उत्पादनाच्या त्यांच्या आदर्शाबद्दल भारत त्यांचा ऋणी राहील. हजारों हिंदी नागरिकांना त्यांनीं उद्योग मिळवून दिला आहे, ही त्यांची आर्थिक क्षेत्रांतील कामगिरीहि महत्त्वाची अशीच आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें त्यांना सन्माननीय सभासदत्व अर्पण करून त्यांचा बहुमान केला, तो जनतेला उचित असाच वाटेल. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मॅन्युअलमध्यें व उमेदवाराच्या गाइड-बुकमध्यें लक्ष्मणरावांच्या आयुष्यक्रमाचा वृत्तांत देण्यांत यावा. आपल्या सर्वांच्या व माझ्या स्वतःच्या वतीनें लक्ष्मणरावांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त मी त्यांना आदरांजलि अर्पण करतो. उत्कृष्टपणें कार्य पार पाडल्याचा व आयुष्य सत्कारणीं लावल्याचा आनंद उपभोगण्यासाठीं त्यांना आणखी दीर्घायुष्य लाभो ! "

### व्यक्तिमत्वाचें रहस्य

"अगदीं विशेष प्रतिकूल परिस्थितींत लक्ष्मणरावांनीं उत्पादन तज्ज्ञ इंजिनिअर म्हणून सुयश मिळविलेलें आहे. त्यांना पूर्वी तांत्रिक ज्ञान किंवा उमेदवारीची संधि मिळाली नसतांहि, त्यांनीं महाराष्ट्र, कर्नाटक व म्हैसूर विभागाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें महत्त्वाचे असे चार सुसज्ज इंजिनिअरिंगचे कारखाने स्थापून यशस्वी केले आहेत. इंजिनिअरिंगविषयक विदेशी मासिकांच्या — विशेषतः "अमेरिकन मेकॅनिस्ट" व अमेरिकन मशिनरी" ह्या अमेरिकन मासिकांच्या — अभ्यासानें ते कारखान-दारीचे धडे शिकले. अगदी लहान वयापासून, हीं मासिकें वर्गणी भरून ते घेत असत. एकादी अडचण उद्भवली किंवा सुधारणा करावयाची असली, कीं ते शास्त्रशुद्ध विचारसरणी, दीर्घोद्योग, निरलसता, जमवून घेण्याची हातोटी, ह्या गुणांमुळें उद्दिष्ट गाठीत असत. ते स्वतःवरतीच अवलंबून राहीत; ह्यांतच त्यांच्या व्यक्तित्वाचें रहस्य आढळतें.

### मुंबईमधील शिक्षण व स्वतंत्र उत्पादनाचे प्रयत्न

" लक्ष्मणरावांचा जन्म २० जून, १८६९ रोजीं गुर्लहोसूर, (सौंदत्ती तालुका, बेळगांव जिल्हा) ह्या गांवीं झाला. प्रथम-पासूनच त्यांना यांत्रिक उत्पादनाची आवड होती. १८ व्या वर्षी ते मुंबईस गेले व तेथें व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट-मध्यें टेक्निकल ड्राफ्टमनशिप शिकले. सकाळीं स्वतः शिकावयाचे व दुपारीं विद्यार्थ्यांना शिकवावयाचे, हा त्यांचा क्रम होता व ह्याच काळांत जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्येंहि ते ड्रॉइंगहि शिकले. अमेरिकन टेक्निकल मासिकांचें त्यांचें वाचन दांडगें होतें. इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थ्यांना ड्राफ्टमनशिप शिकवितांना ते स्वतः वाचलेलें ज्ञान विद्यार्थ्यांना देत. परंतु त्यावेळचे प्रिन्सिपॉल मि. फिथिअन, ह्यांना तें न आवडून, त्यांनीं त्यास बंदी केली. तथापि, लक्ष्मणरावांचा स्वतःचा अभ्यास प्रिन्सिपालसाहेब थांबवूं शकले नाहींत. इन्स्टिट्यूटमध्यें स्टीम एंजिन्स शिकविण्या-साठीं त्यांना ५० रु. पगार मिळे, त्यावर लक्ष्मणराव संतुष्ट रहाणें अशक्य होतें; त्यांचें यांत्रिक उत्पादनाचें ज्ञान पुष्कळच पुढें गेलेलें होतें. त्यांनीं नोकरी सोडून दिली व लहान प्रमाणावर स्वतः उत्पादन करण्यास प्रारंभ केला. त्यांनीं एक सायकलहि विकत घेतली व ती ते वापरूं लागले. मुंबईमध्यें ही गोष्ट नाविन्य-पूर्ण अशीच होती.

### बेळगांव येथें सायकलींचा धंदा

"ह्या सुमारास (१८८६) त्यांना प्लेग झाला, त्यांतून ते सुदैवानें लवकरच बरे झाले. कांहीं प्रतिकूल अनुभवामुळें त्यांना मुंबईचा वीट आला व ते बेळगांवला रहावयास गेले. तेथें त्यांचे वडील बंधु रामुअण्णा हे स्थानिक हायस्कुलांत शिक्षक होते. लक्ष्मणरावांनीं आपल्या सायकलीच्या ज्ञानाच्या भांडवलाचा उपयोग करून सायकलींचा धंदा सुरू केला. अमेरिकन साय-कलींची त्यांनीं एजन्सी मिळविली, सायकली दुरुस्त करण्याचें काम केलें, सायकल चालविण्यास गिऱ्हाइकांना शिकविलें. बेळगांवच्या आसपासच्या सर्व संस्थानिकांचे व लष्करी अधि-काऱ्यांचे ते सायकल-गुरु झाले होते, आणि बेळगांवांतील सर्व युरोपियन लोक लक्ष्मणरावांच्या दुकानांचीं गिऱ्हाइकें होतीं.

### बेळगांव येथील प्रगति

"१८८८ मध्यें लक्ष्मणरावांचे बंधु त्यास त्यांच्या धंद्यांत येऊन मिळाले आणि " किर्लोस्कर बंधु " ही फर्म अस्तित्वांत आली. वाढत्या धंद्याला बेळगांव शहरांतील जागा अपुरी पडूं लागली व कारखाना शहराबाहेर कॅन्टोन्मेंटमध्यें न्यावा लागला. लक्ष्मणरावांनीं आतां पवनचक्क्या व लोखंडी नांगर तयार करण्यास प्रारंभ केला. १९०४ सालीं त्यांचे ६ नांगर खपले; १९१० मध्यें २०० नांगरांची विक्री झाली. ह्या सुमारास औंधच्या राजेसाहेबांनीं लक्ष्मणरावांना औंध येथें एक सार्वजनिक हॉल बांधण्याचें काम दिलें. त्यासाठीं औंधला ते जातांना आपल्या बंधूंचेकडे फर्मचें काम सोंपवीत असत. बेळगांव येथील त्यांचा धंदा पुढें भरभराटीस आला, तो इतका कीं; १९२४ च्या मोसमांत किर्लोस्करवाडीहून ४०,००० नांगरांची विक्री झाली. भारताच्या सर्व कानाकोपऱ्यांत किर्लोस्कर नांगरांची कीर्ति पसरली.

### किर्लोस्करवाडीस स्थलांतर

"बेळगांव म्युनिसिपॅलिटीला किर्लोस्कर कारखाना ज्या जागेवर

होता, ती जागा हवी होती आणि कारखाना हलविणें भाग होतें. ह्यावेळीं, औंधच्या राजेसाहेबांची लक्ष्मणरावांनीं पूर्वी नड भागविली होती, ती गोष्ट कामास आली. औंध हद्दींत कुंडलरोड स्टेशनजवळ राजेसाहेबांनीं लक्ष्मणरावांना ३२ एकर जमीन मोफत देऊं केली आणि. तेथें लक्ष्मणरावांनीं आपला कारखाना हलविला. त्यावेळीं कुंडलरोडची जागा म्हणजे काटाकुटयांनीं भरलेलें निर्जल असें माळरान होतें! लक्ष्मणरावांना औंधकरांनीं नव्या वसाहतीच्या व कारखान्याच्या उभारणीसाठी १०,००० रु. चें कर्ज दिलें. लक्ष्मणरावांनीं ब्रिटिश व अमेरिकन मासिकांच्या वाचनानें मिळविलेल्या ज्ञानाचे आधारें मशीनटूल्स, यांत्रिक शक्ति व इतर गोष्टींनीं सुसज्ज असा कारखाना बनविला. त्यांनीं कामगारांसाठी वसाहत तयार करून वीज, पाणी, शाळा, इस्पितळ, बाळंतपणाचा दवाखाना, थिएटर, स्त्रियांचा क्लब, इत्यादि सुखसोई उपलब्ध करून दिल्या. लक्ष्मणरावांचा धंदा हळुहळु वाढत गेला. उसाचे चरक, शेंगा फोडण्याचीं यंत्रें, वेगवेगळया प्रकारचे पंप, इत्यादींचें उत्पादन त्यांनीं सुरू केलें.

### लिमिटेड कंपनीची स्थापना

"ह्या सुमारास किर्लोस्करवाडी येथील कारखान्याचे लक्ष्मणराव हे एकटेच मालक होते व त्यांच्या नंतरहि कारखाना चालू रहावा व वाढावा, ह्याची तरतूद कशी करावी, ह्याचा ते विचार करीत होते. आपल्या चौघा मुलांपैकीं थोरल्या मुलास कारखाना मिळावा व बाकीच्या तिघांना मिळकतीचा हिस्सा रोखीच्या स्वरूपांत मिळावा, अशी कायदेशीर व्यवस्था त्यांना करून हवी होती. जॉइंट स्टॉक संघटनेची कल्पना त्यांना विदेशी मासिकांच्या पूर्वीच्या वाचनामुळें सुचली, आणि १९२० मध्यें किर्लोस्कर बंधु लि. ही मर्यादित जबाबदारीची कंपनी अस्तित्वांत आली. दुसऱ्या महायुद्धास प्रारंभ झाला, तेव्हां ह्या कारखान्याच्या कामास आणखी जोराची चालना मिळाली. मशीन टूल्स, विजेच्या मोटारी, पंप, लष्करी उपयोगासाठी फर्निचर, हँडग्रेनेड्‌ससाठी स्प्रिंग, इत्यादींच्या मोठ्या सरकारी ऑर्डरींमुळें लक्ष्मणरावांच्या धंद्याची मजबुती वाढली.

### कर्तबगार मुलगे व नातू

"त्यांच्या चार मुलांपैकीं तिघे अमेरिकेंत शिकून आलेले आहेत. सर्वांत मोठ्यानें व लहानानें इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजीचें शिक्षण घेतलेलें आहे. मोठ्या मुलाचा थोरला मुलगा (शंतनुरावांचा मुलगा) हाहि मेन (यु. एस. ए.) चा मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवीधर आहे. वेगवेगळया किर्लोस्कर कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी किर्लोस्कर सन्स आणि कं. कडे आहे आणि त्यांत हे पांचजण जबाबदारीचीं कामें करीत आहेत. किर्लोस्करांच्या मूळ कारखान्याच्या चार प्रमुख शाखा पुढीलप्रमाणें आहेत:—

### किर्लोस्करांचे चार प्रमुख कारखाने

(१) मेसर्स किर्लोस्कर बंधु लि. हा कारखाना किर्लोस्करवाडी येथें आहे. मूळ स्थापना १८८६ सालीं होऊन तो १९२० मध्यें लिमिटेड झाला. त्याचें वसूल भांडवल १५·५३ लक्ष रुपये असून त्यांत १,३०० कामगार शेतीचीं साहित्यें, नांगर, नांगराचे फाळ, ऊंस गाळण्याचे चरक, पंप, इत्यादींचें उत्पादन करीत आहेत. श्री. शंकरराव किर्लोस्कर हे ह्या कारखान्याचे प्रमुख असून त्यांस लक्ष्मणरावांचे तिसरे चिरंजीव प्रभाकरपंत साहाय्य करीत असतात.

(२) दि म्हैसूर किर्लोस्कर लि. हा कारखाना म्हैसूर राज्यांत हरिहर येथें आहे. १९४१ सालीं तो स्थापन झाला. त्याचें वसूल भांडवल २०·२६ लक्ष रु. असून त्यांत ८०० कामगार आहेत. मशीन टूल्स, लेथ्स, शेपिंग मशीन्स, मिलिंग मशिनरी, प्लेनर्स, इत्यादींचें उत्पादन ह्या कारखान्यांत होतें. लक्ष्मणरावाचा दुसरा मुलगा, राजारामपंत, ह्यांचेकडे ह्या कारखान्याचें चालकत्व आहे. कारखान्याजवळ कामगारांसाठी आधुनिक पद्धतीची औद्योगिक वसाहत आहे.

(३) किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि. हा बंगलोर येथील कारखाना १९४६ मध्यें स्थापन झाला. त्यांतील गुंतलेलें वसूल भांडवल २२·२० लक्ष रु. असून तेथें ४०० कामगार १ बी. एच. पी. ते १६० बी. एच. पी. च्या वेगवेगळया प्रकारच्या विजेच्या मोटारी तयार करतात. लक्ष्मणरावांचा सर्वांत कनिष्ठ मुलगा रविंद्र कारखान्याच्या व्यवस्थेंत महत्त्वाचें काम करतात.

(४) किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. हा कारखाना खडकी येथें आहे. २४·०७ लक्ष रुपये वसूल भांडवल, ३०० कामगार, ५ बी. एच. पी. शक्तीच्या ऑईल एंजिनांचें उत्पादन, असा त्याचा तपशील आहे. लक्ष्मणरावांचा थोरला मुलगा शंतनुराव, बॉस्टन (अमेरिका) चे एम्. आय. टी. पदवीधर, ह्यांच्याकडे ह्या कारखान्याचें नेतृत्व आहे, आणि त्यांना शंतनुरावांचा थोरला मुलगा, चंद्रकांत, मेन, (यु. एस. ए.) चे मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवीधर, ह्यांचें उत्कृष्ट साहाय्य होत असतें."

---

हिंदुस्थान एअरक्रॅफ्टचें विमान—चालू महिन्याच्या २० तारखेला कोलंबो येथें विमानांची कवायत भरविण्यांत येणार आहे. तींत भाग घेण्यासाठी बंगलोरच्या हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट कारखान्यानें आपलें एच. टी २ हें विमान नोंदविलें आहे. हा मेळावा सीलोन एअर ॲकॅडेमीतर्फे भरविण्यांत येत असून त्यांत जगाच्या निरनिराळ्या भागांतील स्पर्धक भाग घेत आहेत.

तांत्रिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या—पंजाब सरकार तांत्रिक विषयांचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा १०० रुपयांच्या १४ शिष्यवृत्त्या देणार आहे. पुढील विषयांसाठी त्या देण्यांत येतील:— प्लॅस्टिक तयार करणें, वजनें व मापें तयार करणें, तेलाच्या एंजिनाचे नमुने तयार करणें, कांच काम तयार करणें, कापड–गिरण्यांची यंत्रसामुग्री बनविणें, विजेचे पंखे आणि मोटारी तयार करणें, होझिअरी माशिनरीचें उत्पादन इत्यादी.

### अमेरिकेंतील 'सबवेज' आगगाड्या

अमेरिकेंतील चार शहरांत जमिनीखालून विजेच्या आगगाड्या ये-जा करीत असतात. बॉस्टन, शिकॅगो, न्यूयॉर्क व फिलॅडेलफिया ह्या शहरांत मिळून "सबवेज" ची लांबी ३८० मैल आहे. त्यांपैकीं एकट्या न्यूयॉर्कमधील सबवेजच्या रेल्वेफाट्यांची लांबी २४२ मैल आहे.

---

### "दि हिंदू वीकली रिव्ह्यू"

वरील नांवाचें एक इंग्रजी साप्ताहिक मद्रास येथें दर सोमवारीं १० ऑगस्टपासून प्रसिद्ध होऊं लागलें आहे. त्यांत प्रत्येक आठवड्यास, घडामोडींचा आढावा व दैनिक हिंदूमधील संपादकीय स्फुटांचे उतारे देण्यांत येतील. परदेशांतील वाचकांच्यासाठीच ह्या साप्ताहिकाची योजना केलेली आहे.

## कर्जरोखे, पैसे गुंतविणारांना, अधिकाधिक अनुकूल

राज्य-सरकारांनीं नुकतीच जीं कर्जें उभारलीं, तीं पूर्वीच्या कर्जांच्या मानानें पैसे गुंतविणारांना ज्यास्त अनुकूल होतीं. व्याजाचा दर (४%) हा गेल्या वर्षीइतकाच होता, परंतु आतां परतफेडीची मुदत १२ वर्षांऐवजीं १० वर्षें होती. मद्रास लोनची विक्रीची किंमत ४ आणे कमी ठेवण्यांत आली होती. १९४६ मध्यें स्वस्त पैशाचें धोरण अंमलांत होतें, तेव्हां १५ वर्षे मुदतीचीं कर्जें २¾% व्याजानें मिळालीं. आतां १० वर्षें मुदतीला ४% व्याज पडत आहे. १९४६ मध्यें विक्रीची किंमत १००–८ होती; आतां ती ९९–८ आहे. म्हणजे सरकारला अधिकाधिक ज्यास्त किंमत देऊन पैसा उभारावा लागत आहे :—

राज्य-सरकारांचीं कर्जें

| विक्रीचें वर्ष | राज्य | मुदत (वर्षें) | रक्कम (कोटी रु.) | व्याजाचा दर (%) | विक्रीची किंमत रु. % |
|---|---|---|---|---|---|
| १९४३ | मुंबई | १३ | ३·५० | ३ | १०० |
| | मद्रास | १३ | १·२५ | ३ | ९९½ |
| | मध्यप्रदेश | १३ | ०·५० | ३ | ९९ |
| १९४४ | मुंबई | १४ | ३·४४ | ३ | १०० |
| | मद्रास | १४ | १·१० | ३ | १०० |
| | उत्तरप्रदेश | १४ | ३·५० | ३ | ९८½ |
| | मध्यप्रदेश | १४ | ०·५२½ | ३ | १०० |
| | त्रावणकोर | ८–१० | ३·०० | ३ | १०० |
| १९४५ | मद्रास | १५ | ३·०० | ३ | ९९½ |
| | उत्तरप्रदेश | १५ | २·५० | ३ | ९९½ |
| १९४६ | मद्रास | १५ | ३·०० | २¾ | १००½ |
| | उत्तरप्रदेश | १५ | २·५० | २¾ | १००½ |
| १९४७ | म्हैसूर | १० | ५·०८ | ३ | १०२ |
| १९४८ | मध्यप्रदेश | १६ | २·०० | ३ | ९९ |
| १९४९ | मुंबई | १३ | ६·०० | ३ | ९९ |
| १९५० | मुंबई | १० | ३·०० | ३ | ९९½ |
| | मद्रास | १० | ४·०० | ३ | ९९ |
| | मध्यप्रदेश | १० | १·०० | ३ | ९८½ |
| १९५१ | मुंबई | ११ | ३·०० | ३½ | १०० |
| | मद्रास | ११ | ३·०० | ३½ | ९९¾ |
| | प. बंगाल | ११ | १·७५ | ३½ | १०० |
| | उत्तरप्रदेश | ११ | २·०० | ३½ | ९९½ |
| | मध्यप्रदेश | ११ | १·०० | ३½ | ९९½ |
| १९५२ | मुंबई | १२ | ३·५० | ४ | १०० |
| | मद्रास | १२ | ५·०० | ४ | ९९¾ |
| | प. बंगाल | १२ | २·०० | ४ | १०० |
| | उत्तरप्रदेश | १२ | २·०० | ४ | ९९½ |
| १९५३ | मुंबई | १० | ५·०० | ४ | १०० |
| | मद्रास | १० | ५·०० | ४ | ९९½ |
| | प. बंगाल | १० | ३·०० | ४ | १०० |
| | उत्तरप्रदेश | १० | ५·०० | ४ | ९९½ |
| | मध्यप्रदेश | १० | १·०० | ४ | ९९½ |
| | बिहार | १० | १·०० | ४ | ९९½ |
| | म्हैसूर | १० | ३·०० | ४ | ९९½ |
| | त्रा.कोर-कोचीन | १० | ३·०० | ४ | ९९½ |
| | मध्यभारत | १० | १·०० | ४ | ९९½ |
| | सौराष्ट्र | १० | १·०० | ४ | ९९½ |


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन

अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर

वैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया

गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा

पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया

रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

“ अगा उपायबळें पंगु । पहाड ठाकी ” ॥

—ज्ञानेश्वरी, ८-८१

**ठेवींच्या भांडवलाच्या उपायबलानें**

नवीन १००० टनांचा साखर-कारखाना चालू होऊन

**गेल्या हंगामांत ९६०५५ पोतीं साखरेचें उत्पादन वाढलें**

**कोणाहि ठेवीदाराची ठेव बुडाली नाहीं.**

साखरेच्या वाढत्या उत्पादन-उपाय-बळानें ठेवींची मर्यादा कमी कमी केली जाईल.

साखरविक्रीवर सरकारी नियंत्रण असेपर्यंत रोख रकमेला
कोणाला तरी व्याज द्यावें लागणार

**—बँकांना किंवा ठेवीदारांना—**

**ठेवींच्या व्याजाचे दर**

★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

शेअर व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळूं शकतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. २५ जुलै १९५३.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स्.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.


आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.


## किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे



“ शरद चरक ”

# उसाचे चरक



वसंत नं. ३ चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—

**किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी** (जि. द. सातारा)


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ‘ दुर्गाधिवास ’, ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.